# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. ३९३/२०१९ दिनांक १४/११/२०१९**

**१)अर्धापुर :-** दिनांक १८.०६.२००० ते आज पावेतो, फिर्यादीचे नांदते घरी समतानगर अर्धापुर जि. नांदेड यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस, तुला स्वयपाक चांगला करता येत नाही, रिक्षा घेण्यासाठी माहेरहुन पैसे घेऊन ये म्हणुन मारहाण करुन शारीरीक व मानसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी ३० वर्षीय महीला** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं.२९३/२०१९ कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवि कायदा प्रमाणे गुन्हां दाखल असून **तपास पोहेकॉ/१७०४ चौदंते, मो.क्र. ९९२३१५४२२८** हे करीत आहेत.

**२)भाग्यनगर :-** दिनांक २२.०९.२०१९ रोजीचे, १८.०० वा. चे सुमारास, स्नेहनगर पोलीस कॉलनी नांदेड येथे, यातील फिर्यादी हे एटीएम मशीनमध्ये पैसे काढण्यासाठी गेले असता फिर्यादीचे एटीएम कार्ड मशीनमध्ये इन्स्टालेशन न झाल्याने फिर्यादीच्या पाठीमागील एका अनोळखी इसमाने तुमचे पैसे मी काढुन देतो असे सांगुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीचे एटीएम कार्ड घेऊन त्याच्याकडील असलेले एटीएम फिर्यादीस हात चालाखीने देवुन फिर्यादीचे एटीएम कार्ड आधारे २०,०००/-रु विड्रॉल करुन घेतले व १७,०००/-रु एका खात्यावर ट्रान्सफर करुन घेतले असे मिळुन एकुण ३७,०००/-रु फिर्यादीचे काढुन घेऊन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी रोनाल्ड जॉर्ज जेम्स, वय ७१ वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. हनुमानमंदीर रोड श्रीनगर नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन. ३५६/२०१९ कलम ४२०, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/व्ही.एल. चव्हाण, मो.क्र. ७०२०४०८५९५** हे करीत आहेत.

**३)मुदखेड :-** दिनांक १२.११.२०१९ रोजी चे २३.३० वा. चे सुमारास, जुने बसस्थानक मोकळे जागेमध्ये ता. मुदखेड जि. नांदेड येथे ,यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या अंदर बाहर नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य २४६०/- रुपयाचा मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/७०३ रामदास नरसींग आवळे, वय ३२ वर्षे, व्यवसाय नौकरी ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे मदखेड** गुरन. १९०/२०१९ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/शिंदे, मो.क. ९७६७४११२७९** हे करीत आहेत.

**४)मरखेल :-** दिनांक १३.११.२०१९ रोजी चे ००.३० वा. चे सुमारास, मौ. शिवणी गावातील नंदु गोवर्धन पाटील ता. देगलुर जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य २५,५५०/- रुपयाचा मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/अदित्य निवृत्तीराव लोणीकर, पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे मरखेल** गुरन. १४९/२०१९ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/एम.एस. कनकवळे, मो.क. ९६३७४६५९६६** हे करीत आहेत.

**५) सोनखेड :-** दिनांक ११.११.२०१९ रोजी चे २३.३० वा. चे सुमारास, मौ. किवळा ते उस्माननगर जाणारे रोड लगत वडगाव शिवार ता. लोहा जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन शेतीचे जुन्या वादावरुन फिर्यादी हा शेतातील आख्याडयावर लोखंडी कॉटवर झोपला असता आरोपीतांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन तुला शेत पेरणी करु नको तु शेत पेरणी केलास म्हणुन फिर्यादीचे हातपाय लोखंडी पलंगास बांधुन तोंडात विषारी औषधाची बॉटल काढुन फिर्यादीचे तोंडात विषारी औषध पाजवुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीचे शेतातील सोयाबिन पीकाचे जमा केलेले ढिग जाळुन नुकसान केले. वगैरे **फिर्यादी विठ्ठल माधवराव किवळेकर, वय ५३ वर्षे व्यवसाय शेती रा. किवळा ता. लोहा** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं ११९/२०१९ कलम ३०७, ५०४, ५०६, ४३५, भादंवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/एस.बी. आडे, मो.क्र. ७४९८७१६४६४** हे करीत आहेत.

**६)भाग्यनगर :-** दिनांक १२.११.२०१९ रोजी चे २२.४५ वा. चे सुमारास, वर्कशॉप कॉर्नर पाण्याचे टाकीजवळ ब्रम्हदेव दादा माने बँक जवळ नांदेड येथे, यातील फिर्यादी हा त्यांची स्कुटी क्रं. एम.एच.-२६/ए.ए.-८२३६ वर बसुन घराकडे जात असतांना अनोळखी तीन चोरटयांनी फिर्यादीस थांबुन फिर्यादीच्या पॅन्टच्या खिशातील मोबाईल विवो १७२४ कंपणीचा किंमती १०,५००/-रु चा आज्ञात चोरटयांनी जबरीने चोरुन नेला. फिर्यादीस लोखंडी कडयाने नाकावर मारुन जखमी केले. वगैरे **फिर्यादी गौतम किशनराव शितळे, वय २६ वर्षे, व्यवसाय मजुरी रा. राजेशनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं ३५७/२०१९ कलम ३९४, ३४ भादंवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/व्ही. एल. चव्हाण, मो.क्रं. ७०२०४०८५९५** हे करीत आहेत.

**७)किनवट :-** दिनांक २१.१०.२०१९ रोजी चे ०९.०० ते दि. १३.११.२०१९ चे दरम्यान, कल्याणनगर गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथे, यातील आज्ञात चोरटयाने फिर्यादीचे राहते घरात कोणी नसल्याचे पाहुन बंद घराचे लोखंडी गेटचे व घराचे दाराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटाचे लॉकर तोडुन लॉकर मधील नगदी २३,०००/-रु सोन्याचे दागीने किंमती ४५,०००/-रु चे असे एकुण ६८,०००/-रु किंमतीचा ऐवज चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी मोहम्मद युसूफ खान मोहम्मद उमरखान, वय ३३ वर्षे, व्यवसाय बेकरी मालक रा. कल्याणनगर गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे किनवट** गुरनं २६५/२०१९ कलम ४५७, ४५४, ३८० भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/पवार , मो.नं. ९८५०८९२६६५** हे करीत आहेत.

**८)माहुर :-** दिनांक १२.११.२०१९ रोजी चे २०.०० ते दि. १३.११.२०१९ चे ०७.०० वा. चे दरम्यान, जयश्री ज्वेलर्स सोनार लाईन माहुर जि. नांदेड येथे, यातील आज्ञात चोरटयाने जयश्री ज्वेलर्सचे शटर वाकवुन आत प्रवेश करुन दुकानातील चांदीच्या अंगठया , नाकातील बेसर राशीचे खडे व दोन पैंजन असा एकुण ३४,७५०/-रु चा ऐवज चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी कुंदन सिताराम रुनवाल वय ५५ वर्षे, व्यवसाय व्यापर रा. माहुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे माहुर** गुरनं १४३/२०१९ कलम ४५७, ३८० भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/राख, मो.नं. ०२४६०-२६८४३३** हे करीत आहेत.

**९)अर्धापुर :-** दिनांक १३.११.२०१९ रोजी चे ०१.०० वा. चे सुमारास, मौ. येळेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीने घरासमोर बांधलेला तांबडया रंगाचा बैल, वय ५ वर्षे किंमती २०,०००/-रु चा. बैल आज्ञात आरोपीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी राजाराम ग्यानोजी कपाटे, वय ६५ वर्षे, व्यवसाय शेती रा. येळेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं २९४/२०१९ कलम ३७९, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५६६ बालाजी कोकरे, मो.नं. ८२३७१४५५६६** हे करीत आहेत.

**१०)मरखेल :-** दिनांक १३.११.२०१९ रोजी चे १०.५० वा. चे सुमारास, मौ. शिळवणी ता.देगलुर जि.नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या देशी दारु किमती ४८३६/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/२५०५ प्रभाकर संभाजी कदम, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे मरखेल** गुरन १५०/२०१९ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/२५०५ कदम, मो.क्र. ९९२३६०६७२९** हे करीत आहेत.

**११)मरखेल :-** दिनांक १३.११.२०१९ रोजी चे २१.०५ वा. चे सुमारास, मौ. टाकळी फाटा ता.देगलुर जि.नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या देशी दारु किमती १६६४/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने मो. सा. क्रमांक एम.एच.-२६/बी.बी.-४१३६ वर वाहातूक करीत असतांना ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोउपनि/अजित पुंडलीकराव बिरादार, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे मरखेल** गुरन १५१/२०१९ कलम ६५ (ई), ८३ महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/५२६ पुरी, मो.क्र. ९८२३१४४८९३** हे करीत आहेत.

पोलीस अधिकक्षक कार्यालय,
नांदेड.